कोर्ट प्रत.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -१)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** खडक
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0137 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/04/2024 20:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 08/04/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 09/04/2024
**Time From (वेळेपासून):** 11:23 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 22/04/2024 **Time (वेळ):** 19:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 024
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/04/2024 20:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तहसिलदार कार्यालय, हवेली, पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**




GSM CamScanner(Make in India)

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) Name (नाव): श्री सतोष लक्ष्मण मोरे

(b) Father's Name (वडील चे नाव) : लक्ष्मण मोरे

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1977

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सदनिका क्र 301,वसुंधरा अपार्टमेंट,हिंगणे ,खुर्द, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे 411051,सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सदनिका क्र 301,वसुंधरा अपार्टमेंट,हिंगणे ,खुर्द, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे 411051,सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-7507498069

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /सशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री नरेंद्र भानुदास ढोले | | वडील का नाम : भानुदास ढोले | 1. मु पो घोडेगाव,,ता तेल्हारा, जि अकोला,तेल्हारा,अकोला, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-यांकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|





GSM CamScanner(Make in India)

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दि. 22/04/2024

जबाब

मी, संतोष लक्ष्मण मोरे, वय 47 वर्षे, व्यवसाय : कन्सलटन्सी, रा. सदनिका क्र. 301, वसुंधरा अपार्टमेंट,हिंगणे खुर्द, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे 411051, मो.नं. 7507498069 या नमूद पत्यावर सन 2014 पासून राहवयास असून,अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, पुणे येथे समक्ष हजर राहुन जबाब देतो की,
मी, दि. 07/02/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, पुणे येथे तक्रार दिली की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबियासह राहावयास आहे. मौजे वडदरे, ता. हवेली, जि. पुणे येथील शेतजमीन गट नंबर 175 मधील 27 गुंठे क्षेत्र हे माझ्या मालकीचे असून, सदर गट पुणे पश्चिम चक्राकार मार्गासाठी संपादित होत आहे. याबाबत माझे गट नं. 175 मधील माझ्या मालकीच्या 27 गुंठे क्षेत्राकरीता मला उपविभागीय अधिकारी, हवेली उपविभाग, पुणे यांचेकडुन रु. 34,20,348/- इतकी रक्कम नुकसान भरपाई (मोबदला) म्हणुन मिळणार आहे. या संदर्भातील उपविभागीय अधिकारी, हवेली उपविभाग, पुणे यांचेकडुन संपादित जमिनीचा मोबदला स्विकारण्याबाबत व ताबा सोडुन देणेबाबतची नोटिस मला दि.27/10/2023 रोजी मिळाली आहे. त्याअनुषंगाने मी संपादित जमिनीचा मोबदला मिळणेकरीता दि.04/11/2023 रोजी उपविभागीय अधिकारी, हवेली उपविभाग, पुणे यांचेकडे अर्ज दिला आहे.

यासदर्भाने मला उपविभागीय अधिकारी हवेली उपविभाग, पुणे येथील कार्यालयाने मोबदला रक्कम मिळणेकरीता गट नं.175 चे 7/12 मधील इतर अधिकारात ''कोंडाई को.तुकाराम थोपटे 32 ग बोजा रु. 17.57''अशी पोकळीस्त असलेली नोंद तहसिलदार कार्यालय हवेली यांचेकडुन कमी करुन घेण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी दि. 21/11/2023 रोजी तहसिलदार कचेरी, हवेली पुणे येथे रितसर अर्ज केला. परंतु त्यावर काही कारवाई न झाल्याने मी चौकशीला डिसेंबर 2023 च्या दुस-या आठवडयामध्ये गेलो असता, तेथील अव्वल कारकुन श्री. ढोले यांनी सदरचा बोजा कमी करण्यासाठी 5 लाख 52 हजार रुपये नजराणा भरावा लागेल असे सांगीतले. दरम्यानचे काळात मी महसुलातील जाणकारांचा सल्ला घेतला, त्यावेळी असे लक्षात आले की, सदरची नोंद ही या गटाशी संबंधित नसुन, कुठलाही नजराणा भरावा लागणार नाही.

त्याअनुषंगाने मी पुन्हा दि.17/01/2024 रोजी आवश्यक ते सर्व कागदपत्रांसहित तहसिलदार, हवेली, पुणे यांचेकडे पोकळीस्त नोंद कमी करुन आदेश मिळणेबाबत अर्ज सादर केला. त्याप्रमाणे अव्वल कारकुन ढोले यांनी कागदपत्रे तपासुन दुस-या दिवशी म्हणजेच दि.18/01/2024 रोजी दुपारी अदाजे 02.30 वा. मला फोन करुन बोलावून घेतल्यामुळे मी लगेचच त्या दिवशी तहसिलदार कार्यालयामध्ये गेलो. त्यावेळी श्री ढोले मला म्हणाले, ""मी कार्यालयीन टिपणी तयार करतो, माझं नंतर पाहु, मात्र तहसिलदार साहेबांना तुम्हाला 2 लाख रुपये दयावे लागतील अन्यथा सही होणार नाही."" त्यानंतर मी दि. 18/01/2024 ते 02/02/2024 या कालावधीमध्ये ढोले आणि तहसिलदार किरण सुरवसे साहेबांना 7-8 वेळा तहसिलदार कार्यालयामध्ये भेटलो. दि.02/02/2024 रोजी मी तहसिलदार साहेबांना भेटुन मला 2 लाख रुपये देणे शक्य नसलेबाबत सांगीतले.तेव्हा त्यांनी मला ढोले यांचेकडे काय असेल ते सांगतो असे सांगीतले.

दि.07/02/2024 रोजी मी दुपारी तहसिलदार कार्यालय,हवेली,पुणे येथे जाऊन ढोले यांना भेटलो आणि फाईल वर सही झाली का? असे विचारले. तेव्हा ढोले यानी मला "साहेबांचे पैशाचे काम केल्याशिवाय केबीनच्या बाहेर फाईल येत नाही", असे सांगीतले.

श्री. ढोले हे मला पुन्हा पैसे मागण्याची शक्यता आहे व त्यांनी मागणी केलेली रक्कम कोणतीही शासकीय फी नसुन लाच रक्कम असल्याची खात्री झाल्याने तहसिलदार कार्यालय, हवेली, पुणे येथील अव्वल कारकुन ढोले व तहसिलदार किरण सुरवसे यांचेविरुध्द कारवाई होणेसाठी ला.प्र.वि पुणे येथे तक्रार दिली.

दि 08/02/2024 रोजी मी दोन पंच, श्रीमती भोसले मॅडम असे सुभाषनगर, शुक्रवार पेठ, पुणे येथे एकत्र आलो. सदरवेळी श्रीमती भोसले यानी माझे व पंच नं 1 श्री शिराळ याचे व्हाईस रेकॉर्डरमध्ये पडताळणी निवेदन घेऊन लोकसेवक श्री. किरण सुरवसे, तहसिलदार हवेली व लोकसेवक श्री. ढोले, अव्वल कारकुन, तहसिलदार





GSM CamScanner(Make in India)

कार्यालय, पुणे यांचेकडे पडताळणी कारवाईकामी रवाना केले. मी व पंच नं 1 असे तहसिलदार कार्यालय हवेली येथे गेलो. सदर ठिकाणी लोकसेवक श्री ढोले यांची भेट झाली. त्यावेळी मी माझे कामाचे अनुषंगाने श्री ढोले यांचेशी बोललो असता त्यावेळी श्री ढोले यांनी ""पैसे किती देणार तुम्ही सांगा मला, मी साहेबांना सांगतो, एवढे देतील म्हणुन"" असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना ""दीड लाख रुपयाची व्यवस्था होईल"" असे सांगितले.

दि 09/02/2024 रोजी पंचासमक्ष पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री ढोले यांचेशी बोलणे झाले असता त्यावेळी श्री ढोले यांनी ""साहेब म्हणतात व्यवस्थीत करायला सांगा"" असे इत्यादी बोलणे करुन श्री ढोले यांनी श्री सुरवसे यांचेसाठी केलेल्या दीड लाख रुपये लाच मागणीस दुजोरा दिला. त्यानंतर लोकसेवक तहसिलदार श्री सुरवसे यांचकडे त्यांचे कार्यालयामध्ये पडताळणी कारवाई करण्यात आली. सदरवेळी लोकसेवक श्री सुरवसे यांनी मला त्यांचे कार्यालयामध्ये बोलाविले. त्यावेळी श्री ढोले यांनी श्री सुरवसे यांचेसाठी याकामासाठी पैसे मागितलेबाबत व कामाचे अनुषंगाने श्री सुरवसे यांचेशी माझे बोलणे झाले.

त्यानंतर दि 14/02/2024 व दि 15/02/2024 रोजी लोकसेवक श्री सुरवसे यांचेकडे पडताळणी कारवाई करण्यात आली परंतु त्या दरम्यान श्री सुरवसे याची भेट झाली नाही व पुन्हा दि 20/02/2024 रोजी श्री सुरवसे यांचेकडे पडताळणी कारवाई करण्यात आली त्यादरम्यान लोकसेवक श्री सुरवसे यानी त्यांना भेटण्यास आलेल्या सर्व लोकांसह मलाही एकत्र केबीनमध्ये घेतल्यामुळे लाचेच्या अनुषंगाने काहीही बोलणे झाले नाही.

तसेच दि 15/02/2024 रोजी श्री किरण सुरवसे, तहसिलदार हवेली, पुणे यांचे सहीची जा क्रं तहक/एसआर/5/2024 दि 09/02/2024 रोजीची ऑर्डर माझे घरी पोस्टाव्दारे प्राप्त झाली त त्या ऑर्डरमध्ये मौजे वडदरे, ता हवेली येथील गट नं 175 या मिळकतीच्या इतर हक्कातील कोंडाई को. तुकाराम थोपटे हे नाव व 32ग बोजा रु 17.57 हा शेरा कमी करणेत यावा वगैरे मजकुर आहे.

लोकसेवक श्री सुरवसे यांना काही संशय आल्यासारखे वाटत असल्यामुळे ते माझी भेट टाळत असल्याचे मला वाटते. त्यामुळे लोकसेवक श्री ढोले यांनी स्वत:साठी व तहसिलदार श्री सुरवसे याचेकरीता 1.50 लाख रुपयाची लाचेची मागणी दि 08/02/2024 व दि 09/02/2024 रोजी केली असल्याने व त्यानंतर ते रजेवर गेले व नंतर त्यांना इलेक्शन डयुटी सिंहगड स्कुल आंबेगाव बु, पुणे येथे लागली असलेबाबत मला समजल्याने मी दि 19/03/2024 रोजी श्रीमती भोसले यांना कळविले. त्यानुसार दि 20/03/2024 रोजी श्री ढोले यांचेविरुध्द सापळा कारवाई करण्याचे ठरविले.

त्यानुसार दि 20/03/2024 रोजी लोकसेवक श्री ढोले यांना लाच रक्कम देण्यासाठी 50,000/- रुपये हजर केले. सदर रक्कमेच्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन घेऊन त्या नोंटावर अँन्थ्रेसीन पावडर लाऊन व्हाईस रेकॉडरसह सापळा कारवाईकामी सिंहगड स्कुल, आंबेगाव बु/ येथे मला व पंच नं 1 यांना रवाना केले. सदरवेळी लोकसेवक श्री ढोले हे मिळुन आले परंतु मोजकेच दोन शब्द माझ्याशी बोलुन ते निघुन गेले. सदरवेळी लोकसेवक श्री ढोले यांना संशय आल्याचे माझ्या लक्षात आले. त्यानंतर सापळा कारवाई स्थगीत करण्यात आली. पडताळणी कारवाई दरम्यान व सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री ढोले व लोकसेवक श्री सुरवसे व माझेमध्ये झालेले संभाषण व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे व त्याचे सविस्तर पंचनामे करण्यात आलेले आहे. तसेच श्री ढोले यांचेबाबत संपुर्ण नाव, पत्ता माहिती प्राप्त करुन घेतला. तसेच श्री सुरवसे यांचा देखील या लाच प्रकरणात सहभाग असल्याचा मला संशय आहे.

तरी मौजे वडदरे, ता. हवेली, जि. पुणे येथील शेतजमीन गट नंबर 175 मधील 27 गुंठे क्षेत्र हे माझ्या मालकीचे असून सदरची जमीन पश्चिम चक्राकार मार्गासाठी संपादित होत असुन सदर माझ्या जमिनीचा मला उपविभागीय अधिकारी, हवेली उपविभाग, पुणे यांचेकडुन रु. 34,20,348/- इतकी रक्कम नुकसान भरपाई (मोबदला) म्हणुन मिळणार असुन त्यासाठी उपविभागीय अधिकारी हवेली उपविभाग, पुणे येथील कार्यालयाने गट नं. 175 चे 7/12 मधील पोकळीस्त असलेली नोंद तहसिलदार कार्यालय हवेली यांचेकडुन कमी करुन घेण्यासाठी दि 08/02/2024 व दि 09/02/2024 रोजी तहसिलदार हवेली कार्यालयामधील अव्वल कारकुन श्री ढोले यांनी स्वता:साठी व तहसिलदार हवेली श्री सुरवसे यांचेसाठी 1,50,000/- रुपयाची लाच मागणी तहसिलदार हवेली कार्यालयामध्ये केली म्हणुन श्री नरेंद्र भानुदास ढोले वय 40 वर्षे, धंदा नोकरी- अव्वल कारकुन, तहसिलदार कार्यालय, हवेली, पुणे रा. दर्शन, सेक्टर 18, प्लॉट नं 423, शिवतेजनगर, चिंचवड, पुणे मुळगाव मु पो घोडेगाव,ता तेल्हारा,जि अकोला. यांचेविरुध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे.

वरील टंकलिखीत जबाब मी वाचुन पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

दाखल करणार -सपोनि मिसाळ ठाणे अमलदार खडक पोलीस स्टेशन पुणे शहर

तपासी अमलदार -माधुरी भोसले सहाय्यक पोलीस आयुक्त/पोलीस उप अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो पुणे मो नं. 9823030093


GSM CamScanner(Make in India)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAVINDRA MANOHAR GAIKWAD(I (Inspector)) / POBN72854

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAVINDRA MANOHA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN72854

ठाणे अंमलदार
ग्द्रङ्क पोलीस स्टेशन, पुणे शहर





GSM CamScanner(Make in India)